आजचा दिनविशेष
१९४० : जर्मनी, इटली व जपानने होन्शू बेटावरील टायफूनमध्ये ५,००० लोक ठार झाले.

dainiklokaarambh@gmail.com

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ
LOK AARAMBH संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | शनिवार २७ सप्टेंबर २०२५ | अंक २७७ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु




# राज्यावर मोठं संकट, ५ जिल्ह्यांना थेट इशारा, घराच्या बाहेर पडणे टाळा, पुढील २४ तास धोक्याचे

## आज काही भागात अतिमुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागाने दिला आहे.







## बंगालच्या उपसागरामध्ये कमी दाबाचं क्षेत्र निर्माण झालं आहे, त्यामुळे पुढील काही दिवस राज्यात पावसाचा जोर आणखी वाढणार

राज्यातील अनेक भागांमध्ये अतिवृष्टी झाली असून मोठे नुकसान पिकांचे झाले. मात्र, पाऊस अजूनही थांबण्याचे नाव घेत नाहीये. आज भारतीय हवांमान विभागाकडून अनेक भागांमध्ये अलर्ट जारी करण्यात आला आहे. मुंबई आणि ठाण्यात अतिमुसळधार पावसाचा इशारा देण्यात आलाय. सकाळपासूनच पावसाला सुरूवात झाली आहे. ढगाळ वातावरणामुळे काळोखा पसरला. नागरिकांना काळजी घेण्याचे आवाहन प्रशासनाकडून केले जात आहे. दुसरीकडे पुणे, जालना आणि इतर काही भागांमध्येही पावसाचा इशारा देण्यात आलाय. पुण्याच्या घाटमाथ्यावर आज ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला. गोव्यासह संपूर्ण महाराष्ट्रात बहुतांश ठिकाणी आज पावसाची शक्यता वर्तवण्यात आली. पुणे, सातारा आणि कोल्हापूरच्या घाटमाथ्यावर आज जोरदार पावसाची शक्यता भारतीय हवामानशास्त्र विभागाने दिली. पुण्यात मध्यरात्रीपासून जोरदार पाऊस सुरू असल्याने अनेक ठिकाणी रस्त्यावर पाणी साचले. हवामान खात्याच्या अंदाजानुसार ठाण्यात पावसाला सुरुवात झालीये. अतिमुसळधार पावसाचा इशारा देण्यात आलाय. धाराशिव जिल्ह्यातील भूम तालुक्यामध्ये मध्यरात्रीपासून जोरदार पाऊस सुरू आहे. मध्यरात्रीपासून मेघगर्जनेसह जोरदार पाऊस सुरू आहे. हवामान खात्याकडून पुढील दोन दिवस मुसळधार पावसाचा अलर्ट जारी करण्यात आलाय. जालना जिल्ह्याला आज येलो अलर्ट तर उद्या रेड अलर्ट जारी करण्यात आलाय. पावसामुळे जालना जिल्हातील शेतांचे मोठे नुकसान झाले असून अजूनही पाऊस पडताना दिसत आहे. ताशी 40 ते 50 किलोमीटर वेगाने वारे वाहून मुसळधार पावसाची शक्यता आहे. जालना जिल्ह्यात मागील तीन दिवसांपासून पावसाने विश्रांती घेतली असली तरी हवामान विभागाकडून पुन्हा एकदा जालना जिल्ह्याला आज ऑरेंज अलर्ट तर उद्या रेड अलर्ट जारी करण्यात आलाय. यामुळे जिल्ह्यात ताशी 40 ते 50 किलोमीटर प्रति तास वेगाने वारे वाहून जिल्ह्यात विविध ठिकाणी मुसळधार पावसाची शक्यता आहे. मागील आठवड्यात जिल्ह्यात अनेक ठिकाणी अतिवृष्टी झाल्यामुळे शेतकऱ्यांचं मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. त्यामुळे पुन्हा एकदा हवामान विभागाकडून इशारा देण्यात आला असल्याने शेतकऱ्यांसह नागरिकांची चिंता वाढली आहे. धाराशिव जिल्ह्यात पुन्हा पावसाचा कहर नद्यांनी धोक्याची पातळी ओलांडली आहे. धाराशिव जिल्ह्यात रात्रभर सुरू असलेल्या पावसाने पुन्हा एकदा कहर केला आहे. या पावसात भूम परंडा परिसरातील नळी, दुधना, बानगंगा या नद्यांनी धोक्याची पातळी ओलांडली आहे. रात्रभर सुरू असलेल्या पावसामुळे पुन्हा शेत शिवारात मोठ्या प्रमाणात पाणी साचले असून पुन्हा नद्या धोक्याच्या पातळी बाहेर प्रवाहित झाल्या आहेत.

## ग्लोबल डिजीटल हेल्थ समीट मध्ये सहभाग ,वंदना विनोद बरडे सहायक अधीसेवीका उपजिल्हा रुग्णालय वरोरा जील्हा चंद्रपूर

बीड प्रतिनिधी दिनांक १९ सप्टेंबर ते २१ सप्टेंबर २०२५ पर्यंत हे ग्लोबल डिजीटल हेल्थ समीट आयोजित होते. त्यात एकमेव चंद्रपूर जिल्ह्यातुन वंदना विनोद बरडे सहायक अधीसेवीका उपजिल्हा रुग्णालय वरोरा या सहभागी झाल्या होत्या.हे ग्लोबल डिजीटल हेल्थ समीट हे मुंबईमधील जिओ वर्ल्ड सेन्टर कुर्ला येथे होते. या ग्लोबल डिजीटल हेल्थ समीट मध्ये सर्व देशांचे प्रतिनिधी होते. जवळ जवळ ५००० सहभागी व १०० वेगवेगळ्या विषयांतील तज्ज्ञ यात सहभागी होते.ग्लोबोलायझेशन , आरोग्य, योजना,विमा, याविषयी चिंतन, मंथन झाले.आणी महत्वाचे





म्हणजे ए.आय.आर्टिफिशियल ऑन्टीलीजीअन्स विषयी ट्रेनिंग व सेमिनार,वर्कशाप झालेत .हे विषय जागतिक पातळीवर कसे काम करतात आणि आरोग्य व रुग्ण यांना कसे फायद्याचे आहे हे समजाविण्यात आलें आहे.आणी ते काळाची काय गरज आहे.कसे उपयोगी आणि तोटेही विषयी मंथन झाले.या कार्यक्रमालाडॉ.जोशे. ल्यूईस कोब्ज सेरॉनो जागतिक परिचर्या परिषद अध्यक्ष ,टि. दिलिप कुमार भारतीय परिचर्या परिषद अध्यक्ष ,महाराष्ट्र परिचर्या परिषद अध्यक्ष राजाभाऊ राठोड,डॉ.निलीमा सोनवणे सह संचालक शुश्रुषा विभाग मुंबई सर्व संघटनांचे पदाधिकारी सदस्य सहभागी होते.यामध्ये वंदना विनोद बरडे सहायक अधीसेवीका उपजिल्हा रुग्णालय वरोरा ह्या सहभागी झाल्या होत्या.आणी विशेष आकर्षण अजिंक्य रहाणे वर्ल्ड पापुलर क्रिकेटपटू हेही उपस्थित होते आणि त्यांनी जागतिक पातळीवर कस खेळायचे काय करायचे हे समजावून सांगितले.

## ओला दुष्काळ जाहीर करून हेक्टरी ५० हजार रुपयांची मदत द्या - प्रा.अण्णासाहेब मतकर



बीड प्रतिनिधी अंकुश गवळी गेल्या काही दिवसापासून मराठवाड्यासह महाराष्ट्रभर पावसाने प्रचंड थैमान घातलेले आहे आणि शेतकऱ्याचा हाता तोंडाशी आलेला घास हिरावून घेतलेला आहे सोयाबीन कापूस सह सर्वच पिकांचे प्रचंड नुकसान झाल्याने शेतकरी हवालदिल झालेला आहे एवढेच नाही तर अनेक ठिकाणी दावणीची जनावरे देखील दगावल्याच्या बातम्या समोर येत आहेत अशा परिस्थितीमध्ये जर शेतकऱ्यांना मदत केली नाही तर शेतकरी देशोधडीला लागतील त्यामुळे सामाजिक दायीतव लक्षात घेऊन शेतकऱ्याच्या डोळ्यातील अश्रूची कदर करत महाराष्ट्र शासनाने तात्काळ मराठवाड्यासह महाराष्ट्रभर ओला दुष्काळ जाहीर करावा आणि शेतकऱ्यांना कोणतेही निकष न लावता हेक्टरी ५० हजार सरसकट मदत जाहीर करावी व तसेच पशुधनाचे नुकसान झाले आहे त्याचीही भरपाई द्यावी अशी मागणी राष्ट्रीय समाज पक्षाचे जिल्हाध्यक्ष प्राध्यापक अण्णासाहेब मतकर यांनी केली आहे,

## बीड हादरले : यश ढाकाची निर्घृण हत्या - आर्या सामाजिक प्रतिष्ठानचा तीव्र इशारा



बीड :शहरातील माने कॉम्प्लेक्स परिसरात घडलेली तरुण यश ढाका (पुत्र पत्रकार देवेंद्र सिंह ढाका) याची निर्घृण हत्या ही घटना संपूर्ण समाजाला हादरवणारी आहे. केवळ शुल्लक कारणावरून घडलेली ही अमानुष घटना कायदा-सुव्यवस्थेवर मोठा प्रश्नचिन्ह उपस्थित करते.या प्रकरणात गुन्हेगारांना तातडीने अटक करून कठोरात कठोर शिक्षा व्हावी, हीच समाजाची अपेक्षा आहे.आर्या सामाजिक प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष विनोद दादा हातागळे यांनी या घटनेवर तीव्र संताप व्यक्त करताना स्पष्ट इशारा दिला आहे की -ङ्गही केवळ एका कुटुंबाचे नुकसान नसून संपूर्ण समाजासाठी धोक्याची घंटा आहे. गुन्हेगारांना कठोर शिक्षा न झाल्यास आर्या सामाजिक प्रतिष्ठानच्या वतीने रस्त्यावर उतरून तीव्र भूमिका घेतली जाईल. या दुःखद प्रसंगात आर्या सामाजिक प्रतिष्ठान व संपूर्ण समाज पत्रकार देवेंद्र सिंह ढाका यांच्या कुटुंबीयांच्या पाठीशी खंबीरपणे उभा आहे.

## अतिवृष्टीच्या पंचनाम्यात दुजाभाव कराल तर याद राखा

### खा.बजरंग सोनवणे यांचा इशारा, पाटोदा, आष्टी तालुक्यात केली नुकसानीची पाहणी

पाटोदा/आष्टी: मराठवाड्यात अतिवृष्टीने थैमान घातले आहे. शेतकरी संकटात सापडला आहे. त्यांना शक्य तितकी मदत करणे गरजेचे आहे. असे असताना काही अधिकारी पंचनाम्यात दुजाभाव करण्याचे पातक करत असल्याचे दिसत आहे. अधिकाऱ्यांनी ओल्या दुष्काळात सापडलेल्या शेतकऱ्यांसोबत माणूसकीने वागावे, दुजाभाव कराल तर याद राखा, असा इशारा खा.बजरंग सोनवणे यांनी दिला आहे. राष्ट्रवादीचे जेष्ठ नेते जयंत पाटील हे दि.२६, शुक्रवारी रोजी बीड जिल्ह्यातील अतिवृष्टीतील नुकसान पाहणी दौऱ्यावर आले होते. यावेळी खा.बजरंग सोनवणे यांनी सकाळी पाटोदा शहरात भेटी देवून तेथील पुरपरिस्थतीने झालेल्या नुकसानची पाहणी केली. यानंतर ते कारेगाव येथे



नुकसानीच्या पाहणीसाठी पोहचले. याठिकाणी जेष्ठ नेते जयंत पाटील, जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, युवक प्रदेशाध्यक्ष महेबूब शेख, पाटोदा तालुकाध्यक्ष आनंद जाधव, माजी आमदार संगीता ठोंबरे, सुशीला मोराळे, राजेसाहेब देशमुख, यांची उपस्थिती होती. यानंतर त्यांनी डोंगरकिन्ही येथे भेट दिली. तर आष्टी तालुक्यातील धामनगाव, कडा, चोभानिमगाव, शिराळ या गावात अतिवृष्टीने झालेल्या नुकसानीची पाहणी केली. यावेळी अण्णासाहेब चौधरी, जिल्हा उपाध्यक्ष सतीश शिंदे, राम खाडे, आष्टी तालुका अध्यक्ष सुनील नाथ, अमोल तरटे, शेख रिझवान, संजय थोरवे, अशोक पोकळे, जगनाथ ढोबळे, राहुल काकडे यांच्यासह तालुक्यातील अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. यावेळी पुढे बोलताना खा.बजरंग सोनवणे म्हणाले, जिल्ह्यात सर्वत्र अतिवृष्टी झाली आहे. लोक एकमेकांना मदतीचा हात देवून माणूसकी दाखवत आहे. अशा परिस्थतीत माणूसकी दाखविणे आवश्यक आहे. असे असताना काही अधिकारी, कर्मचारी पंचनाम्यात दुजाभाव करत असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. असे असेल तर ही पध्दत चुकीची आहे. पंचनामे योग्य पध्दतीने झाले नाही अथवा दुजाभाव केला तर सामान्य शेतकरी मदतीपासून वंचित राहू शकतात. अशावेळी अधिकारी-कर्मचाऱ्यांनी दुजाभाव न करता पंचनामे करावेत. जर पंचनाम्यात दुजाभाव केला अशी तक्रार आली तर याद राखा, दुजाभाव करण्याचे पातक करू नका, असा सल्लाही खा.बजरंग सोनवणे यांनी दिला. दरम्यान, बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले असून पंचनामे करण्यात वेळ वाया घालविण्यापेक्षा सरसकट मदत द्यावी, जिथे शेतात माती राहिली नाही, पिके सडलेली दिसत आहेत, तिथे पंचनामे कशाचे करायचे, इतके तरी सत्ताधारी मंडळींनी लक्षात घेणे आवश्यक आहे, असेही खा.सोनवणे म्हणाले.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

शनिवार २७ सप्टेंबर २०२५
https://lokaarambh.com



संपादकीय

## UPI च्या माध्यमातून मित्रांकडून पैसे मागणे होणार बंद, 1 ऑक्टोबरपासून लागू होतील हे नवीन नियम




प्रत्येक महिन्याच्या 1 तारखेला बँकिंग, रेल्वे, टपाल कार्यालय, क्रेडिट कार्ड, गॅस सिलेंडरच्या किंमतीसंदर्भात काही ना काही बदल होतो. 1 ऑक्टोबर 2025 पासून देशभरातही मोठे बदल लागू होत आहे. रेल्वे तिकीट बुकिंग आणि आरक्षणापासून त्याची झलक पाहायला मिळेल. तर राष्ट्रीय निवृत्ती प्रणालीसंबंधी (NPS) नियमात बदल होत आहे. तर युपीआयवर 100 रुपये पाठव, 200 रुपये पाठव अशी रिक्वेस्ट पाठवणाऱ्या मित्रांपासून आता सुटका होणार आहे. तर 1 ऑक्टोबरपासून घरगुती गॅस सिलेंडरच्या किंमतीत बदल होतो की नाही याकडे ग्राहकांचे लक्ष लागले आहे. सणासुदीत किंमती कमी होण्याची ग्राहकांची अपेक्षा आहे. काय काय आहेत हे बदल जाणून घ्या. रेल्वेने पहिल्यांदा ट्रेनमध्ये तात्काळ तिकीट बुकिंग प्रक्रियेत मोठा बदल केला होता. त्यातंर्गत तात्काळ तिकीट बुकिंग करताना आधार व्हेरिफिकेशन, पडताळा आवश्यक होता. आता आता जनरल आरक्षणासाठी सुद्धा ई आधार व्हेरिफिकेशन गरजेचे आहे. नवीन नियम 1 ऑक्टोबरपासून लागू होतील. तिकीट बुकिंग करताना सुरुवातीला 15 मिनिटांचा कालावधी ऑनलाईन तिकीट बुकिंगसाठी असेल.

### ऑनलाईन गेमिंग कायदा 2025

ऑनलाईन गेमिंग कायदा 2025 1 ऑक्टोबरपासून लागू होईल. हा कायदा आणण्यापूर्वी सरकारने गेमिंग कंपन्या, बँका आणि इतर लोकांनी चर्चेच्या फेऱ्या केल्या आहेत. प्रमोशन अँड रेग्युलेशन ऑफ ऑनलाईन गेमिंग बिल 2025 मुळे रिअल मनी गेमिंगवर पूर्णपणे बंदी येणार आहे. तर पैशांआधारीत ऑफर्स, त्याचा प्रचार, प्रसारास बंदी आहे. ऑनलाईन गेम खेळल्यास कोणत्याही शिक्षेची तरतूद नाही. पण रिअल मनी गेमचे प्रमोशन ऑफर्स देणाऱ्यांना 3 वर्षांची शिक्षा आणि 1 कोटी रुपयांपर्यंतचा दंड ठोठावण्यात येणार आहे.

### युपीआयवरील उधारी खाते बंद

1 ऑक्टोबर 2025 पासून UPI युझर्ससाठी महत्त्वाचा बदल होत आहे. आता PhonePe, Paytm वा दुसऱ्या पेमेंट प्लॅटफॉर्मवरून मित्र, नातेवाईकांकडे पैशांची रिक्वेस्ट पाठवता येणार नाही. UPI चे कलेक्ट रिक्वेस्ट, पूल ट्रान्झॅक्शन पूर्णपणे बंद करण्यात आले आहे. कारण अनेक जण पेमेंट रिक्वेस्ट पाठवून समोरच्याला हैराण करत होते.

### पेन्शन फंडमध्ये बदल

राष्ट्रीय निवृत्ती निधी नियंत्रक प्राधिकरणाने (PFRDA) राष्ट्रीय निवृत्ती प्रणालीत (NPS) मोठा बदलास होकार भरला आहे. हा नियम 1 ऑक्टोबर 2025 पासून लागू होईल. त्याला मल्टिपल स्कीम फ्रेमवर्क असे नाव देण्यात आले आहे. त्यातंर्गत सरकारी कर्मचारी नसलेल्या कॉर्पोरेट क्षेत्रातील कर्मचारी, गिग वर्कर्स यांना पॅन कार्ड क्रमांकावरून अनेक योजनेत थेट गुंतवणूक करता येईल.

# नंदपूर येथील मोहिनी उबाळेची छत्रपती संभाजी नगर पोलीसपदी निवड

## शेतकरी चंद्रसेन उबाळेच्या चार मुली झाल्या पोलीस

माझ्या तीन बहिणी पोलीस होत्या अभ्यासात त्यांचे मार्गदर्शन मिळाले, गुरू कृष्णा पाठक सर फिजिकल साठी सकाळीच मैदानावर तयारी करून घेत होते, योध्दा अभ्यासिकेत लक्ष देत होते. वडील चंद्रसेन उबाळे यांनी आम्हाला काहीही कमी पडू दिले नाही तीन- चार वेळा अपयश आले; पण त्यांनी आम्हाला खचून न देता सतत मेहनत करण्याची प्रेरणा दिली त्यांच्या मुळेच आम्ही पोलीस होऊ शकलोत. ------- **मोहिनी उबाळे.(छत्रपती संभाजी नगर कारागृह पोलीस)**



माझ्या मुली खूप मेहनती आहेत त्यांना आमच्या गरीबीची जाणिव होती त्यामुळेच त्या पोलीस झाल्या आहेत.पोलीस होऊन देखील त्या सुट्टी मध्ये कसलीही लाज न बाळगता मला शेतीत मदत करतात.. कितीही स्पर्धा असली तरी चांगल्या प्रयत्नांना नक्कीच यश मिळते.. माझी छोटी मुलगी प्रियांका उबाळे ही पोलीस भरतीची तयारी करीत आहे ती पोलीस झाल्यावर माझ्या जीवनाचे सार्थक होईल... ......... **वडील -चंद्रसेन उबाळे ( कष्टाळू शेतकरी रा.नंदपूर ता. गेवराई)**

बीड प्रतिनिधी अंकुश गवळी गेवराई तालुक्यातील नंदपुर येथील कष्टाळू शेतकरी आई -वडील संगिता चंद्रसेन उबाळेची चौथी मुलगी कु. मोहिनी चंद्रसेन उबाळेची छत्रपती संभाजी नगर कारागृह पोलीस निवड झाल्याने तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. मोहिनी उबाळेचे प्राथमिक शिक्षण नंदपूर येथील जि.प. शाळेत झाले माध्यमिक शिक्षण मारफळा येथील शाळेत तर उच्च माध्यमिक शिक्षण गढी येथील जयभवानी महाविद्यालयात झाले गेल्या तीन वर्षांपासून ती बीड येथील योध्दा अकॅडमीचे संचालक कृष्णा पाठक सर यांच्या मार्गदर्शनातून पोलीस भरतीची तयारी करीत होती तिने संभाजी नगर येथे परीक्षा दिली होती त्याचा निकाल हाती आल्याने तिच्या कष्टाचे चीज झाले आहे. प्रचंड मेहनत, जिद्द, अभ्यासात सातत्य, ग्राउंड मधील कामगिरीच्या जोरावर ती यशस्वी झाली नुकत्याच नमो मॅरेथॉन स्पर्धेत ती तृतीय क्रमांकाने तर गत दोन वर्षांतील मॅरेथॉन स्पर्धेत ती प्रथम, द्वितीय क्रमांकाने विजयी झाली आहे. बीड, पुणे, रायगड भरतीत आलेले अपयश विसरून तिने संभाजीनगर पोलीस भरती सर केली. पोलीस भरतीतील अभ्यासा सोबत तिने वडील चंद्रसेन उबाळे यांना शेतीतील कापूस लावणे, फवारणी, वेचणी, तन काढणे, बाजरी, ज्वारी काढणे यात सहकार्य केले हे काम करताना रात्री जागून अभ्यास केला याचेच फळ तिला मिळाले. वडील शेतकरी चंद्रसेन उबाळे यांनी कोरडवाहू शेतीमध्ये ओला- कोरडा दुष्काळाचा सामना केला प्रसंगी कर्ज काढले पण आपल्या मुलींना पोलीस करण्यासाठी उच्च शिक्षण दिले यामुळेच मोठी मुलगी ज्योती उबाळे (बीड पोलीस २०१४),सध्या माजलगाव येथे कार्यरत, दुसरी मुलगी अश्विनी उबाळे ( पिंपरी चिंचवड पोलीस -२०२१) तिसरी मुलगी दिपाली उबाळे ( बीड पोलीस-२०२४) व आता मोहिनी उबाळे ( संभाजी नगर कारागृह पोलीस-२०२५) अशा उबाळे कुटुंबात चार मुली पोलीस झाल्या त्यांचा हा संघर्षमय प्रवास सर्वांसाठी प्रेरणादायक आहे. हा प्रवास पूर्ण करण्यासाठी गुरू योध्दा अकॅडमीचे संचालक कृष्णा पाठक सर यांचे अनमोल सहकार्य लाभले.. मोहिनी उबाळे छत्रपती संभाजी नगर पोलीस हिचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

# बीड जिल्ह्यातील गैर कानुनी व चुकीच्या पध्दतीने ३०० ते ४०० लिफ्ट बेकायदेशीर,

## सामाजिक कार्यकर्ते स्वप्निल वरपे यांनी घेतली राज्याचे मुख्यमंत्री अजित दादा पवार यांची भेट,

## उर्जा विभागाला देणार आहेत चौकशीचे आदेश,

बीड प्रतिनिधी,अंकुश गवळी बीड जिल्ह्यातील गैर कानुनी व चुकीच्या पध्दतीने 300 ते 400 लिफ्ट बसविण्यात आलेल्या आहेत, त्यामध्ये 15 ते 20 ठेकेदार व बीड जिल्ह्यतील काही वरिष्ठ अधिकारी यांची पूर्णपणे चौकशी करून यामध्ये जे दोषी आढळतील त्यांच्यावर कायदेशीर कार्यवाही करून ज्या विना परवान्याच्या लिफ्ट बीड जिल्ह्यात चालू आहेत; त्या तात्काळ सिल करण्यात याव्यात व त्या ठेकेदारांचे लायसन्स रद्द करणे बाबत.स्वप्नील वरपे पाटील या सामाजिक कार्यकर्ते यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांची भेट घेतली आहे व रितसर निवेदन दिले आहे. उपरोक्त विषयी आपणास सविनय अर्ज करण्यात येतो की, बीड जिल्ह्यातील गैर कानुनी 300 ते 400 लिफ्टचे चुकीच्या पध्दतीने बसविण्यात आलेले आहेत. त्यामध्ये काही लिफ्टला एमरजन्सी रिस्की डिव्हाईस बसविलेले नाहीत. रिस्की डिव्हाईसचे काम लाईट गेल्यानंतर लिफ्ट एका फ्लोअरला सोडते. लिफ्टच्या वर सेफ्टी बॅरिकेट बसविलेले नाहीत. मोटरला एमरजंन्सी ब्रेक बसविलेले नाहीत. एमरजंन्सी ब्रेकचे काम लिफ्ट अडकल्याच्या नंतर त्याचा वापर केला जातो. लिफ्टला चक्कर प्लेट बसविलेली नाही. लिफ्टच्या



चक्कर प्लेटचे काम सेफ्टी नाही. लिफ्टला खड्यामध्ये जी सेफ्टी असते ते बफर स्प्रिंग बसविलेली नाही. बीड जिल्ह्यातील देखभाल दुरूस्तीचे रेकॉर्ड जिल्ह्यातील अधिकाऱ्यांकडे उपलब्ध नाही. नवीन लिफ्टला परवानगी देण्याची जागेवर जाऊन वार्षिक तपासणी करण्याची जबाबदारी ऊर्जा विभागाच्या अंतर्गत असते. परंतु बीड मधील कोर्ट तसेच हॉस्पिटल जिल्ह्यातील सरकारी ऑफीस, कार्यालय, घरगुती बिल्डींग्स, अपार्टमेंट बीड मधील या सर्व जागेत चुकीच्या पध्दतीने लिफ्टचे अर्धवट कामे करून लिफ्ट बसविण्यात आलेले आहेत व जिल्ह्यातील सर्व लिफ्ट धारकांना लिफ्टचे डुप्लीकेट परवाने काही वरिष्ठ अधिकाऱ्यांनी व ठेकेदारांनी दिले आहेत.. यामध्ये लिफ्ट अचानक बंद पडली व काही दुर्घटना घडली तर याला जबाबदार कोण? दि.03/08/2025 रोजी शिवाजीराव हार्ड केअर ॲण्ड इमेजिंग सेंटर बीड या हॉस्पिटलमध्ये मराठा योध्दा मा. मनोज (दादा) जरांगे पाटील यांच्यासोबत या हॉस्पिटलच्या लिफ्टमध्ये दुर्घटना घडली होती. त्यामध्ये जर लिफ्टचे पूर्णपणे काम व्यवस्थित केलेले असते तर अशा होणाऱ्या लिफ्टमध्ये होणाऱ्या दुर्घटना घडल्या नसत्या. शिवाजीराव हार्ड केअर ॲण्ड इमेजिंग सेंटर बीड या हॉस्पिटलचे लिफ्टचे लाईसन्स नसून सुध्दा लिफ्ट चालू आहे. या निष्काळजीपणाला कोणते अधिकारी व ठेकेदार जबाबदार कोण?

बीड जिल्ह्यामध्ये 300 ते 400 लिफ्ट चुकीच्या पध्दतीने अर्धवट कामे करून बसविलेले आहेत व त्यामध्ये प्रत्येक लिफ्ट धारकाला कलर झेरॉक्स काढून डुप्लीकेट लाईसन्स दिले आहेत. यामध्ये हा सर्वकाही चुकीच्या पध्दतीचा पैशाचा लुटमारी कारभार या बीड जिल्ह्यातील वरीष्ठ अधिकाऱ्यांसोबत मिळून केला आहे. बीड जिल्ह्यामध्ये सरकारी ऑफीस कार्यालय, सर्व हॉस्पिटल्स, घरगुती बिल्डींस व अपार्टमेंट या जागेत ज्या काही लिफ्ट बसविलेल्या आहेत. त्या प्रत्येक लिफ्टची पाहणी करून व त्या प्रत्येक लिफ्ट धारकाचे लायसन्स व्हेरीफाय करून ते ओरिजनल आहेत की डुप्लीकेट पाहण्यात यावेत व ज्या लिफ्टधारकाचे काम अपूर्ण व लायसन्स नाहीत त्या लिफ्ट तात्काळ बंद करण्यात याव्यात व बीड जिल्ह्यातील वरिष्ठ अधिकारी व ठेकेदार यांच्यावर तात्काळ कार्यवाही करून या ठेकेदारांची लायसन्स रद्द करण्यात यावेत व यांच्या अर्धवट कामामुळे लिफ्ट मध्ये होणाऱ्या दुर्घटना टळतील ही मा. साहेबांना नम्र विनंती सदरील मागणी निवेदनाद्वारे सामाजिक कार्यकर्ते स्वप्निल वरपे पाटील यांनी केले आहे

# स्थानिक गुन्हे शाखा, बीड यांची गुटखा व सुगंधी तंबाखू विरोधात मोठी कारवाई

बीड: प्रतिनिधी मा.पोलीस अधीक्षक, बीड श्री.नवनीत कांवत यांनी अवैध धंद्यावर कारवाई करण्याचे आदेश दिल्यावरून स्थानिक गुन्हे शाखे, बीड येथील पोलीस निरीक्षक श्री.शिवाजी बंटेवाड यांच्या पथकाला महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधक केलेला व अवैधरित्या विक्रीसाठी आणलेला गुटखा व सुगंधी तंबाखू पकडण्यात मोठे यश मिळवले आहे. सदरची कारवाई ही मसाजोग, ता.केज, जि.बीड येथे करण्यात आली आहे. या कारवाईदरम्यान पथकाने स्थानिक गुन्हे शाखेच्या पाथकाने एकूण ₹ 34,46,227/- किमतीचा गुटखा व सुगंधी तंबाखूचा साठा जप्त केला. महाराष्ट्र शासनाने गुटखा व सुगंधी तंबाखूच्या विक्रीवर संपूर्ण बंदी



घातली असतांनापण आरोपी नामे 1) रोहित आसाराम देशमुख, 35 वर्ष रा. मसाजोग ता. केज व 2) साहेबराव लिंबा आंधळे, वय 45 वर्ष रा.आंधळ्याचीवाडी ता. केज जि.बीड यांनी स्वतःचे ताब्यात बाळगल्याने तो जप्त करण्यात आलेला आहे. स्थानिक गुन्हे शाखेच्या अधिकाऱ्यांनी व अंमलदार यांनी वरील आरोपीविरुद्ध पोलीस स्टेशन केज येथे गुन्हा दाखल करण्यात आलेला असून पुढील तपास पोलीस स्टेशन केज येथील अधिकारी हे करत आहेत. या कारवाईमुळे जिल्ह्यात गुटखा व सुगंधी तंबाखूची अवैध विक्री रोखण्यास मोठा हातभार लागणार आहे. ही कारवाई मा.पोलीस अधीक्षक श्री.नवनीत कांवत, मा.अप्पर पोलीस अधीक्षक श्री. सचिन पांडकर, श्रीमती चेतना तिडके मॅडम यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड, पोलीस उपनिरीक्षक श्रीराम खटावकर पोलीस अंमलदार अनंत मस्के, विकास राठोड, सोमनाथ गायकवाड, अंकुश वरपे, राहुल शिंदे, राख, अश्फाक सय्यद, मनोज परजने, नितीन वडमारे, सिद्धार्थ मांजरे, सुनील राठोड सर्व नेमणूक स्थानिक गुन्हे शाखा बीड यांनी केली आहे.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

शनिवार २७ सप्टेंबर २०२५
https://lokaarambh.com



## अष्टभुजाधारी,आदिशक्ती सप्तश्रृंगी देवी



महाराष्ट्रातील साडेतीन शक्तीपीठापैकी अर्धशक्तीपीठ मानले जाणारे, आदिशक्तीचे हे मूळ स्थान असलेले, आठ फूट उंचीची पाषाणात कोरलेली अष्ट भुजाधारी देवीच्या अठरा हातात विविध आयुधे असणारी  गडावर चढण्यासाठी अंदाजे पाचशे दहा पायऱ्या आणि नैसर्गिक सौंदर्य, आजूबाजूचा परिसर घनदाट जंगलाने वेढलेल्या, नागमोडी वळण,खोल खोल द-या अशा सप्तश्रृंगी गडावर विराजमान असणारी देवी सप्तश्रृंगी.....        कोल्हापूरची महालक्ष्मी, तुळजापूरची तुळजाभवानी व माहूरची रेणुका हे तीन पूर्ण शक्तिपीठ आहेत व अर्ध शक्तीपीठ म्हणजेच देवी सप्तश्रृगी होय....

मला बऱ्याच दिवसापासून सप्तश्रृंगी देवीच्या दर्शनाची आस मनात होती. आणि ती 18 जानेवारी 2025 ला पूर्ण झाली. माझ्या मुलीच्या म्हणजे विधीचा ज्ञानवर्धिनी प्रसार मंडळ नाशिक संचालित सलग 25 तास स्वरचित कवितांच्या वाचनाचा विश्वविक्रम या कार्यक्रमात निवड झाली. आणि आम्ही दोघीही नाशिकला रवाना झालो कवी संमेलन आटोपल्यावर आम्ही दुसऱ्या दिवशी लगेच सप्तश्रृंगीला गेलो. तेव्हा आम्ही अदशक्तिपीठ असलेल्या सप्तश्रृगी देवीचे दर्शन झाले.

सर्वप्रथम आम्ही नाशिक वरून 60 किमी अंतरावर असणाऱ्या नांदुरी गावी सीबीएस या गाडीने गेलो. मंदिरात जाण्यासाठी 510 पायऱ्या असल्यामुळे ते चढून जाणे शक्य नव्हते. म्हणून आम्ही लिफ्टनी गेलो. पण रविवार असल्यामुळे खूपच गर्दी होती. आम्हाला तीन ते चार तास वाट बघावी लागली. त्यानंतर आम्हाला दर्शन झाले. पण तिथेही व्हि आय पी लोकांना जवळून दर्शन व सामान्य लोकांना दुरून दर्शन घ्यावे लागत होते. पण आम्हाला एक वयोवृद्धगृहस्थ भेटले. त्यांना  व्हीआयपी दर्शन घ्यायचे होते. त्यांनी आम्हास विचारले,तुम्ही  कुठून आलेत. मी लगेच गडचिरोली म्हटले. त्यांना  आश्चर्य वाटले.एवढ्या लांबून महाराष्ट्राचा शेवटचा टोक आहे.असे संबोधले आणि का कुणास ठाऊक त्यांनी आम्हाला आपल्या सोबत दर्शनासाठी देवीच्या गाभाऱ्यापर्यंत  घेऊन गेले. आणि आम्हाला अगदी जवळून  देवी सप्तश्रृगीचे दर्शन झाले .अनेक  कुटुंबाची आराध्य दैवत असलेल्या सप्तश्रृंगी देवी तीर्थक्षेत्र आहे. आम्हास देवीचे अठराभुजा  सप्तश्रृंग रूप  बघावयास मिळाले. देवीची स्वयंभू मूर्ती येथे विराजमान आहे. येथील गाभाऱ्याला सोन्याच्या पत्रानी सजविले आहे.शिवाय शक्तीद्वार, सूर्यद्वार आणि चंद्रद्वार असे तीन दरवाजे आहेत. या तिन्ही दरवाजातून भाविक भक्तांना सप्तश्रृंगी देवीचे दर्शन घेता येते.देवीची  मूर्ती ही आठ फूट उंचीची आहे.या मूर्तीला शेंदूर लावलेले आहे. देवीने आपल्या प्रत्येक हातात वेगवेगळी आयुधे धारण केलेली आहे. सप्तश्रृंगी देवीला अकरावार साडी व तीन खण  चोळी लागते.देवीच्या डोक्यावर सोन्याचा मुकुट आहे. कर्णफुल, नथ व गळ्यात मंगळसूत्र आणि पुतळ्याचे गाठले आहे. कमरेला पट्टा, पाया तोडे असे अलंकार देवी अंगावर परिधान केलेली आहे.पहाटेच्या पाच वाजता देवीचे मंदिर उघडते. आणि साडेपाच वाजता काकड आरती होते सात वाजता देवीची महापूजेला सुरुवात होऊन पंचांमृतानी देवीला स्नान घातले जाते. 11 वार शालू घालून तिचा  साज श्रृंगार केला जातो. मुखात पानाचा विढा तसेच पेठा आणि वेगवेगळ्या फळांचा नैवेद्य देवीला दाखविला जाते. शुक्लपक्ष दशमीला  या ठिकाणी मोठा उत्साह साजरा केला जातो. दसरा आणि नवरात्रीला जल्लोष असतो. तेव्हा हजारो भाविक भक्त सप्तश्रृंगी देवीच्या दर्शनाला येतात. व आपल्या मनोकामना पूर्ण करण्यासाठी देवीला साकडे घालतात.भक्ताच्या हाकेला सप्तश्रृगी धावून येते.

लेखन
सौ.ज्योत्स्ना भास्कर बन्सोड
कुरखेडा,जि.गडचिरोली
9823735002

# बळवंतराव कदम माध्यमिक विद्यालयाची विद्यार्थिनी कु. समीक्षा डोईफोडे  हीची कुस्ती स्पर्धेत विभागीय स्तरावर निवड!

येळंब(घाट) दिनांक २६ सप्टेंबर: बळवंतराव कदम माध्यमिक विद्यालय, येळंब(घाट) ची विद्यार्थीनी कु. समीक्षा बापुराव डोईफोडे हीने जिल्हास्तरीय शालेय कुस्ती स्पर्धेत पहिला क्रमांक पटकावला असून तीची विभागीय पातळीवर निवड झाली आहे.या बाबत अधिक माहिती अशी की नुकत्याच जिल्हास्तरीय शालेय स्पर्धा संपन्न झाल्या. या स्पर्धेत येथील बळवंतराव कदम माध्यमिक विद्यालयाने मुलींच्या  कुस्ती स्पर्धा प्रकारात दैदिप्यम ान यश संपादन केले.  १७ वयोगटा खालील मुलींच्या कुस्ती प्रकारात कु. समीक्षा बापुराव डोईफोडे या विद्यार्थिनीने जिल्ह्यातून आलेल्या सर्व प्रतिस्पर्धी



स्पर्धकावर मात करत जिल्हास्तरावर प्रथम क्रमांक मिळवून विभागीय स्तरावर निवड निश्चित केली आहे. प्रशालेने आपल्या सर्वच क्षेत्रातील दैदिप्यमान यशाची परंपरा कायम राखत पुन्हा एकदा ग्रामीण भागातून बालाघाटावर सर्वोत्कृष्ट होण्याचा बहुमान मिळिवला आहे. कु. समीक्षा डोईफोडे हीच्या या यशाबद्दल व सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे आणि मार्गदर्शक क्रीडा शिक्षक श्री मोहिते एम. व्ही. सहाय्यक क्रीडा शिक्षक श्री लहाने डी. एस.,श्री भोसले ए. एन. व श्रीम गणगे व्ही. एम. यांचे  श्री नारायणगड शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव श्री दिनकररावजी कदम साहेब यासह सर्व संचालक मंडळ , प्रशालेचे मुख्याध्यापक श्री  राजकुमार कदम, पर्यवेक्षक श्री चौरे व्ही. एस. यासह सर्व प्राध्यापक शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन व कौतुक केले आहे . या निकालाबाबत संपूर्ण पंचक्रोशीतील शिक्षण प्रेमी नागरिक यांनी कु समीक्षा डोईफोडे हीचे कौतुक व अभिनंदन केले आहे.

# जिल्हाधिकारी कार्यालियात आंतरराष्ट्रीय माहिती अधिकार दिन संपन्न

बीड,दि.26 : आंतरराष्ट्रीय माहिती अधिकार दिनानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन सभागृहात माहिती अधिकार अधिनियमाविषयी जनजागृती करण्यासाठी माहिती अधिकार दिन संपन्न झाला.

यावेळी अपर जिल्हाधिकारी हरिष धार्मिक, (सामान्य प्रशसनाचे.) उपजिल्हाधिकारी शैलेश सुर्यवंशी, रोजगार हमी योजनेचे उपजिल्हाधिकारी अभ्युदय मूळे, ॲड शाहदेव ननवरे, तहसीलदार नरेंद्र कुलकर्णी विविध विभागांचे अधिकारी तसेच माहिती अधिकारी उपस्थित होते. याप्रसंगी माहिती अधिकार कायद्याचे महत्त्व, त्याची अंमलबजावणी आणि नागरिकांना योग्य वेळेत माहिती द्यावी, माहिती अधिकाराचे अर्जाचे प्रथमत: वाचन करुन, सामान्य व्यक्तीचे 20 टक्के म्हणने ऐकुण घ्यावे त्यावर कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले तर आपणास 100 टक्के काम केल्याचे समाधान वाटेल. उरलेले 80 टक्के काम सहजगतीने होईल, जो खरा गरजवंत आहे त्याला माहिती देण्याला प्रधान्य दिले तर आपण आपले कर्तव्य पार पाडल्याचे समाधान आपणास मिळेल, असे अपर जिल्हाधिकारी हरीष धार्मिक यावेळी म्हणाले. सर्व विभागांना माहिती अधिकार कायद्यानुसार येणाऱ्या अर्जांची तत्परतेने आणि पारदर्शक पद्धतीने कार्यवाही करण्याच्या सूचनाही श्री. धार्मिक यांनी दिल्या.तसेच जनतेला या कायद्याबद्दल अधिक माहिती मिळावी यासाठी जनजागृती कार्यक्रम राबवण्यावरही भर देण्यात आला. माहिती अधिकार कायद्यामुळे प्रशासनात पारदर्शकता येते आणि लोकशाही अधिक मजबूत होते, असे श्री. धार्मिक यांनी सांगितले. माहिती अधिकार अधिनियम 2005 अंतर्गत प्राप्त अर्जांवर वेळेत कार्यवाही करण्याचे,माहिती अधिकार कायद्याचे महत्त्व आणि लोकशाहीतील भूमिका यावर त्यांनी मार्गदर्शन केले.सर्व शासकीय कार्यालयांनी माहिती अधिकार कायद्याचे काटेकोर पालन करण्याचे निर्देशही यावेळी त्यांनी दिले. नागरिकांना माहिती अधिकार कायद्याविषयी जागरूक करण्यासाठी उपक्रम राबवण्याची गरज आहे असे ते म्हणाले.

माहितीची पारदर्शकता, जबाबदारी आणि सुशासन या मूल्यांचा पुनरुच्चारबाबतच्या सूचना  दिल्या. विभागीय अधिकारी व माहिती अधिकारी यांनी माहिती अधिकार अर्जदार नागरिकास  वेळेत आणि अचूक माहिती पुरवावी असे त्यांनी सांगितले.  अपूर्ण अथवा विलंबित माहितीमुळे नागरिकांमध्ये असमाधान निर्माण होऊ नये, याची दक्षता  घ्यावी. यावेळी ॲड शहादेव ननवरे यांना विशेष अतिथी म्हणून अंमत्रित करण्यात आले होते  त्यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, माहिती अधिकार कायद्याची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी प्रत्येक विभागाने ऑनलाईन अर्ज निकाली काढले तर माहिती अधिकार सोप्या पध्दतीने हाताळता येईल आणि प्रकरणेही प्रलंबित राहणार नाही, कोणी विनाकारण त्रास देण्यासाठी माहिती अधिकाराचा वापर करत असेल तर अशा वेळी पोलीस प्रशासनाची मदतही घेता येईल तसेच आपण प्रामाणिकपणे काम केले असेल तर घाबरण्याचे कारण नाही.  असे त्यांनी यावेळी सांगितले.

# अपर जिल्हादंडाधिकारी यांचे प्रतिबंधात्मक आदेश जारी

बीड, दि,26:- बीड जिल्हयात कायदा व सुव्यस्थेबाबत दि. 22 सप्टेंबर पासून नवरात्र उत्सव सुरु झाला असून दि. 2 ऑक्टोबर 2025 रोजी दसरा सण असून त्याच दिवशी सावरगाव घाट आणि नारायणगड दसरा मेळावा होणार आहे तसेच राजकिय पक्ष संघटनेच्या वतीने न्याय मागण्यासाठी विविध प्रकारचे निदर्शने, अंदोलने, उपोषण,मोर्चे इत्यादी होण्याची शक्यता आहे. यामूळे अचानक घडणा-या घटनावरुन व किरकोळ कारणावरुन तणाव निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही त्याअनुषंगाने कायदा व सुव्यवस्था आबाधित रहावी यासाठी अपर जिल्हादंडाधिकारी यांच्याकडून प्रतिबंधात्मक आदेश जारी करण्यात आले आहे. दिनांक 27 सप्टेंबर 2025 रोजीचे रात्री 00.01 वाजेपासून ते दि. 11 ऑक्टोबर 2025 रोजीचे 24.00 वाजेपर्यंत  बीड जिल्हयात या कालावधीत महाराष्ट्र पोलीस कायदा 37 (1) (3) अन्वये  काढण्यात येणा-या प्रतिबंधात्मक आदेशामध्ये मोर्चे, निदर्शने, आंदोलने, धरणे आंदोलने यासारख्या आंदोलनामध्ये पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तीचा समावेश असलेल्या कोणत्याही जमावास परवानगी शिवाय एकत्र येण्यास निर्बंध राहील. जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था आबाधीत राहावी या करीता कलम 37 (1)  (3 ) अन्वये  मनाई आदेश जारी केला आहे.


शासकीय कर्तव्य पार पाडणा-या कर्मचा-यां व्यतिरिक्त अन्य कोणत्याही व्यक्तीस सार्वजनिक ठिकाणी किंवा त्यांच्या जवळपास खालील बाबीस मनाई करण्यात आली आहे.

या अन्वये शस्त्र, सोटे ,काठी, तलवार, बंदूक, लाठया, काठया, कोणतेही दाहक पदार्थ, किंवा स्फोटके, दगड, किंवा इतर क्षेपाणस्त्रे, शरीरास इजा होणा-या वस्तू बाळगण्यास मनाई करण्यात आली आहे. आवेशी भाषणे, अंगविक्षेप, विडांबनात्मक नकल, सभ्यता, नितिमत्ता यास बाधा येईल किंवा ज्यामुळे राज्याची सुरक्षिता धोक्यात येईल, किंवा अराजकता माजेल अशी चित्रे, निशाणी, घोषणा फलक किंवा इतर कोणतीही वस्तू जवळ बाळगू नये.

जाहिरपणे घोषणा करणे, गाणी म्हणणे, वाद्य वाजविणे किंवा कोणतीही कृती जे देशाच्या संविधानातील मुल्ल्यांच्या विरुध्द असेल किंवा देशाचा मान व सार्वभौमत्व यांना इजा पोहचणार असेल किंवा सार्वजनिक सुरक्षा आणि सामाजिक सलोखा यांना हानी पोहचणारी असेल, व्यक्तीच्या किंवा शवांच्या किंवा प्रेते किंवा आकृती,किंवा त्यांच्या प्रतिमा यांचे प्रदर्शन यासाठी मनाई आहे. पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तींचा समावेश असलेल्या कोणत्याही जमावास परवानगी शिवाय एकत्र येता येणार नाही, मिरवणूका मोर्चे काढता येणार नाही. कोणताही मोर्चा, सभा, मिरवणूक व तत्सम कोणतीही कृती करण्यासाठी त्या क्षेत्रातील सक्षम पोलीस अधिका-यांची पूर्वमान्यता घेणे आवश्यक राहील. तसेच विशेषरित्या परवानगी दिलेल्या मिरवणूकीस लागु राहणार नाहीत व अशी कोणतीही मनाई राज्य शासनाच्या मंजूरीशिवाय 15 दिवसापेक्षा जास्त मुदतीपर्यंत अमलात राहणार नाही.

-----

# शिवतेज थोरात यांची 'इपिक' कंपनीत असिस्टंट मॅनेजरपदी निवड



खर्डा (ता. जामखेड) : येथील दैनिक लोकमतचे पत्रकार संतोष थोरात यांचे चिरंजीव शिवतेज यांनी जागतिक स्तरावरील जॉर्डन देशातून इपिक या नामांकित कपडा निर्मिती कंपनीत टेक्स्टाईल इंजिनिअर म्हणून कार्यरत राहून उल्लेखनीय कामगिरी केली. त्यांच्या कामातील चिकाटी, एकाग्रता व चाणाक्ष बुद्धीमुळे कंपनीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी त्यांचा गौरव करत भारतातील भुवनेश्वर (ओडिशा) येथील शाखेत असिस्टंट मॅनेजरपदी त्यांची नियुक्ती केली आहे.

ही नियुक्तीपत्र मिळताच थोरात कुटुंबासह संपूर्ण खर्डा शहरात व परिसरात आनंदाचे वातावरण पसरले. परदेशात काम करत असताना पुन्हा भारतात नामांकित कंपनीच्या उच्च पदावर जबाबदारी मिळाल्यामुळे शिवतेज यांचे कौतुक सर्वत्र होत आहे.

शिवतेज थोरात यांनी आपले श्री छत्रपती कनिष्ठ महाविद्यालय खर्डा येथे बारावीपर्यंतचे शिक्षण पूर्ण करून अभियांत्रिकी शिक्षण इचलकरंजी येथील डी. के. टी. ई. टेक्स्टाईल अँड इंजिनिअरिंग इन्स्टिट्यूटमध्ये पूर्ण केले. कॉलेजच्या कॅम्पस इंटरव्ह्यूमध्ये पहिल्याच प्रयत्नात ते परदेशात जाण्यासाठी निवडले गेले होते. त्यानंतर काही वर्षांत त्यांनी मेहनत, गुणवत्तापूर्ण कामगिरी व व्यवस्थापन कौशल्य सिद्ध करून ही मोठी संधी मिळवली. या यशाबद्दल खर्डा प्रेस क्लबतर्फे शिवतेज थोरात यांचा सत्कार करण्यात आला. ग्रामीण भागातील विद्यार्थ्याने शिक्षणाच्या जोरावर परदेशात जाऊन मोठ्या पदावर यश मिळवले व आता भारतात उच्च पदावर काम करण्याची संधी मिळवली, यामुळे खर्डा व परिसरातील विद्यार्थ्यांमध्ये शैक्षणिक ऊर्जा निर्माण झाली आहे.

दैनिक
लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
शनिवार २७ सप्टेंबर २०२५
https://lokaarambh.com


# लक्ष्मण हाके चळवळीतून बाहेर पडणार? घेणार मोठा निर्णय

राज्यात सध्या आरक्षणाचा मुद्दा चांगलाच तापला आहे, मराठा आरक्षणाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रात हैदराबाद गॅझेट लागू केल्यानंतर मराठा विरोधात ओबीसी समाज असं चित्र निर्माण झाल्याचं पहायला मिळत आहे. मराठा समाजाला ओबीसी समाजामधून आरक्षण देऊ नका, त्यांना स्वंतत्र्य आरक्षण द्या, अशी ओबीसी समाजाची मागणी आहे. यासाठी ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी देखील मोठा लढा उभारला आहे. त्यांनी मराठा समाजाला ओबीसीमधून मिळणाऱ्या आरक्षणाला जोरदार विरोध केला आहे. यावरून अनेकदा मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील आणि लक्ष्मण हाके हे आमने-सामने आल्याचं देखील पहायला मिळालं. दोघांनीही एकमेकांवर जोरदार टीका केली. मात्र आता लक्ष्मण हाके हे लवकरच मोठा निर्णय घेण्याच्या तयारीमध्ये आहेत, त्याबद्दल त्यांनी तसे संकेत देखील दिले आहेत. त्यांची फेसबुक पोस्ट चांगलीच चर्चेमध्ये आली आहे. नेमकं काय म्हटलं हाके यांनी? ‘मी प्रामाणिकपणे भांडतोय, ओबीसी भटके एकत्र आले पाहिजेत म्हणून, आपले हक्क अधिकार टिकले पाहिजेत म्हणून, मी एक मेंढपाळ धनगराचं पोरगं आहे, मी बॅनर छापू शकत नाही, गाडी ला पैसे देऊ शकत नाही, भले मोठे स्टेज लावू शकत नाही, कुणाला चहा पाजू शकत नाही, हे माहित



असूनही तुम्ही आजपर्यंत मला साथ दिलीत, उपोषण आंदोलन असो की मोर्चे, एल्गार मेळावे असोत किंवा रॅली, तुम्ही ताकदीने माझ्या पाठीशी उभे राहिलात, मला पाठिंबा देत राहिलात, मी तुमचे आभार मानावेत तेवढे कमी आहेत, मी ओबीसी च्या बाजूने बोलत गेलो, भांडत गेलो, ओबीसीच्या छोट्या छोट्या जात समूहाना जोडत गेलो, लाखो माणसं जोडली पण शत्रू ची संख्या सुद्धा वाढत गेली, हल्ले झाले, झेलले, पण आत्ता सहन होत नाही, उद्या दैत्यानांदूर ता पाथर्डी जि अहिल्यानगर च्या ओबीसी मेळाव्यानंतर मी माझी भूमिका जाहीर करेन, मी आंदोलनात असेन किंवा नसेनही तुम्ही जेवढी साथ दिलीत त्याबद्दल जाहीर जाहीर आभार मानतो – लक्ष्मण हाके’ असं हाके यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटलं आहे.

# ओला दुष्काळ जाहीर करुन शेतकऱ्यांना तात्काळ मदत जाहीर करा –जिजाऊ ब्रिगेडची मागणी

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नांदेड : संपूर्ण महाराष्ट्रात तसेच नांदेड जिल्ह्यात अतिवृष्टी आणि पूरस्थितीमुळे शेतकऱ्यांचे अतोनात झालेले नुकसान भरून काढण्यासाठी शासनाने त्वरित ओला दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना तात्काळ मदत जाहीर करावी व पूर्ण कर्जमाफी करावे या मागणीचे निवेदन मराठा सेवा संघ प्रणित जिजाऊ ब्रिगेडच्या महिलांनी शुक्रवार दि.२६–सप्टेंबर रोजी निवासी उपजिल्हाधिकारी किरण आंबेकर यांच्यामार्फत शासनास देण्यात आले. निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, शेतकऱ्यांवर



आलेले हे अस्मानी संकट वेळीच सावरले नाही तर शेतकऱ्यांच्या कुटुंबांवर उपासमारीची वेळ येईल, मुलांचे शिक्षण अडचणीत येईल आणि खचलेल्या शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे प्रमाण वाढेल. पंचनाम्यासारख्या प्रक्रियेत वेळ न दवडता सर्व शेतकऱ्यांना सरसकट मदत जाहीर करावी, तसेच सणासुदीच्या काळात शेतकऱ्यांच्या घरची चूल पेटण्यासाठी शासनाने तत्काळ निर्णय घ्यावा, अशी जिजाऊ ब्रिगेडच्या महिलांची भावनिक विनंती केली आहे.या निवेदनावर जिजाऊ ब्रिगेडच्या जिल्हाध्यक्षा सुमित्रा वडजकर जिल्हाध्यक्षा कल्पना चव्हाण सचिव अर्चना होगे, मीनल सूर्यवंशी यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# कै.पार्वतीबाई सिरसाट यांचे निधन



नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट नांदेड : लोहा तालुक्यातील उमरा येथील जेष्ठ महिला नागरिक पार्वतीबाई विश्वंभरराव पाटील सिरसाट वय ८० वर्षे यांचे दि. २६- सप्टेंबर २०२५ रोजी सायंकाळी ६ वाजता वृद्धापकाळाने निधन झाले असून त्यांच्या पार्थिवावर दि.२७- सप्टेंबर शनिवारी दुपारी १२ वाजता उमरा येथे अंत्य संस्कार करण्यात येणार आहेत. कै.पार्वतीबाई सिरसाट यांचे पश्चात एक मुलगा, चार मुली, सून,जावई, नाती, नातू असा मोठा परिवार आहे. त्या भानुदास सिरसाट, विठ्ठलराव सिरसाट यांच्या भावजय व गोविंदराव सिरसाट, एम.डी.सिरसाट (गुरुजी) यांच्या काकू तर मुदखेड येथील दुय्यम निबंधक कार्यालयातील कर्मचारी अरविंद विश्वंभरराव सिरसाट यांच्या मातोश्री होत.

# जल्लोष युवक महोत्सवात श्री संत गजानन महाविद्यालयाचा झेंडा रोवला!



खर्डा ( प्रतिनिधी ): सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे अंतर्गत दादा पाटील म हाविद्यालय, कर्जत येथे नुकताच पार पडलेल्या जल्लोष युवक महोत्सवामध्ये श्री संत गजानन महाविद्यालय, खर्डा या महाविद्यालयाने आपला सांस्कृतिक ठसा उमटवला आहे.बी.ए. द्वितीय वर्षात शिक्षण घेत असलेला चि. निखिल बाजीराव खोसे याने शास्त्रीय तालवाद्य पखव–ाज वादन स्पर्धेत विभागीय स्तरावर प्रथम क्रमांक पटकावून महाविद्यालयाचे नाव उज्ज्वल केले. निखिल याला या कामगिरीसाठी श्री. अविनाश धर्मराज भोगिल यांचे कसून म ार्गदर्शन लाभले.या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचे सचिव मा. डॉ. महेश गोलेकर, महाविद्यालय विकास समिती अध्यक्ष मा. विजयसिंह गोलेकर, प्राचार्य डॉ. चंद्र–सेन आवारे, प्रा. डॉ. राजू म्हेत्रे, प्रा. धनंजय जवळेकर, उ. प्रा. डॉ. शिवानंदन जाधव यांनी या यशाबद्दल निखिलचे मन:पूर्वक अभिनंदन करत त्याच्या पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या.निखिलने केलेले हे सादरीकरण केवळ शिस्तबद्धतेचेच नव्हे, तर त्याच्या साधनेतील सातत्याचेही प्रतीक ठरले. यामुळे खर्डा परिसरात आनंदाचे व अभिमानाचे वातावरण आहे.

# ओला दुष्काळ जाहीर करुन तातडीची मदत द्या – संयुक्त किसान मोर्च्याचे आंदोलन

बीड (दि.२६) : जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले असून शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. तरीदेखील शासनाने आजवर ओला दुष्काळ जाहीर न करणे व प्रती गुंठा अवघे ८५ रुपये मदत जाहीर करणे ही शेतकऱ्यांची क्रूर थट्टा असल्याचा आरोप संयुक्त किसान मोर्च्याने केला. या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर तीव्र आंदोलन छेडण्यात आले. शासनास मागण्यांचे निवेदन प्रमुख पदाधिकाऱ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांमार्फत सादर केले. प्राचार्य कॉ. डी. जी. तांदळे म्हणाले की, ङ्गसरकारने असंवेदनशीलता सोडून ओला दुष्काळ जाहीर करावा. प्रती हेक्टर किमान १ लाख रुपयांची तातडीची मदत देऊन शेतकऱ्यांना आधार




द्यावा. तसेच नदीकाठच्या गावांना वेगळी नुकसानभरपाई द्यावी. आंदोलनात महाराष्ट्र राज्य किसान सभा, भारतीय कम्युनिस्ट पक्ष, शेतकरी कामगार पक्ष, कॉंग्रेस किसान सेल, संभाजी ब्रिगेड, आम आदमी पक्ष, शिव संग्राम, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष, इंटक, माहिती अधिकार संघटना, मराठा महासंघ, पत्रकार संघ, शिक्षक संघ, सामाजिक संस्था अशा विविध पक्ष–संघटना सहभागी झाल्या. नेत्यांनी संतप्त शब्दात सरकारवर टीका केली की, ङ्ग२०२७ च्या कुंभमेळ्यासाठी तब्बल १२ ते १४ हजार कोटींची तरतूद होते, पण कोलमडलेल्या शेतकऱ्यांसाठी केवळ २२१५ कोटी? हा अन्याय आम्ही सहन करणार नाही.ङ्घ या आंदोलनात जेष्ठ कॉ. उत्तमराव सानप, प्राचार्य कॉ. डी. जी. तांदळे, कॉ. ज्योतिराम हुरकुडे, भाई मोहन गुंड, कॉ. पंकज चव्हाण, कॉ. नितीन जायभाये, गणेश मस्के, डॉ. गणेश ढवळे, प्राचार्य युवराज मुरुमकर यांच्यासह अनेक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेतकऱ्यांचा ठाम पवित्रा : ओला दुष्काळ तातडीने जाहीर करावा. प्रती हेक्टर किमान १ लाख मदत द्यावी. नदीकाठच्या गावांसाठी स्वतंत्र नुकसानभरपाई जाहीर करावी. सरकारने सकारात्मक निर्णय घेतला नाही तर आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा संयुक्त किसान मोर्च्याने दिला.

# पूरग्रस्तांच्या मदतीसाठी सावली फाउंडेशन व अधिपती नागरी सहकारी पतसंस्था पुढे सरसावली

## – चेअरमन दिपक गर्जे यांच्या नेतृत्वाखाली शेकडो कुटुंबांना किराणा किट वाटप

पाटोदा (प्रतिनिधी) पाटोदा शहर व परिसरात झालेल्या अतीवृष्टीमुळे पूरस्थिती निर्माण झाली असून अनेक घरांमध्ये पाणी शिरल्याने कुटुंबांचे संसार उद्ध्वस्त झाले आहेत. अन्नधान्य, कपडे, धान्यसाठे व घरगुती वस्तूंचे मोठे नुकसान झाले. या संकटग्रस्त कुटुंबांच्या मदतीसाठी सावली फाउंडेशन व अधिपती नागरी सहकारी पतसंस्था, पाटोदा या दोन्ही संस्थांनी पुढाकार घेतला. संस्थेचे चेअरमन दिपक गर्जे यांच्या नेतृत्वाखाली पूरग्रस्तांना किराणा किट वाटप करण्यात आले. यात तांदूळ, गहू, डाळी, तेल, मसाले, साखर, चहा, मीठ व इतर आवश्यक वस्तूंचा समावेश होता. या मदतीमुळे शेकडो कुटुंबांना तात्पुरता का होईना, पण मोठा दिलासा मिळाला.मदत वितरणावेळी संस्थेचे पदाधिकारी, संचालक मंडळ सदस्य, कार्यकर्ते तसेच आमदार सुरेश आण्णा धस यांचे स्वीयसहाय्यक सुशील ढोले, पाटोदा नगरपंचायतचे सभापती रामेश्वर गोरे यांच्यासह स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या प्रसंगी पूरग्रस्त नागरिकांशी संवाद साधून त्यांना मानसिक धीरही दिला गेला. नागरिकांनी या मदत उपक्रमाचे मनःपूर्वक स्वागत केले. “पूरस्थितीमुळे आम्ही अक्षरशः हतबल झालो होतो. परंतु सावली फाउंडेशन व अधिपती नागरी सहकारी पतसंस्थेने दिलेल्या किराणा किटमुळे आमच्या कुटुंबाला मोठा आधार मिळाला. या मदतीमुळे आम्हाला पुन्हा उभारी मिळाली,” असे पूरग्रस्तांनी सांगितले. चेअरमन दिपक गर्जे यांनी सांगितले की, “पूरस्थितीमुळे कोणीही उपाशी राहू नये, ही आमची जबाबदारी आहे. समाजाने संकट काळात एकदिलाने पुढे येणे गरजेचे आहे. भविष्यात देखील पूरग्रस्तांना शक्य ती मदत करण्याचा आमचा संकल्प आहे.”या उपक्रमामुळे सावली फाउंडेशन व अधिपती नागरी सहकारी पतसंस्थेने समाजाप्रती असलेली आपली बांधिलकी अधोरेखित केली असून, हा उपक्रम समाजातील इतर संस्था व दानशूर मंडळींसाठी प्रेरणादायी ठरत आहे.



This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com